## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

### तक्रार क्रमांक : ११३१/२०२२

**तक्रारकर्ता,** श्री.शशिकांत शांताराम ठाकूर,
खोली क्र.४०१, महावीर पॅलेस,
प्लॉट नं. ३४१/४२, सेक्टर ३१ ए,
वाशी गांव, नवी मुंबई ४०० ७०३.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, कल्याण,उप विभागीय अभियंता क्र.१ कल्याण यांचे कार्यालय शासकीय विश्रामगृह आवार, कल्याण जि.ठाणे ४२१३०१.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, कल्याण,उप विभागीय अभियंता क्र.१ कल्याण यांचे कार्यालय शासकीय विश्रामगृह आवार, कल्याण जि.ठाणे ४२१३०१.

**तक्रार सुनावणीचा दिनांक : १८/११/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| ३०/११/२०२१ | ---- | १०/१/२०२२ | २३/२/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.८/६/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक १८/११/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.एम.बी.हिरवे, उप अभियंता, सा.बां.उपविभाग कल्याण व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.पी.एम.पराळे, शाखा अभियंता उपस्थित आणि तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.पी.टी.मानकर, शाखा अभियंता तसेच श्री.एस.ए.महाडिक, शाखा अभियंता अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" आपल्या विभागअंतर्गत विधानसभा खासदार/आमदार निधीतून लोकोपयोगी सुरु असलेल्या व झालेल्या कामांची माहिती मिळणे. १) उपरोक्त विभागामध्ये कोणाच्या निधीतून कामे होत आहेत व झालेली आहेत त्या सर्व कामांची यादी व कामांचा पत्ता माहितीसाठी मिळणे. २) उपरोक्त विभागामध्ये कोणत्या ठेकेदाराकडून उपरोक्त कामाचा ठेका देण्यात आलेला आहे, त्याचे नाव, पत्ता, कंपनीचे नाव, परवाना क्र.सेल्स टॅक्स क्र.वॅट क्र.त्याबाबत सविस्तर माहिती मिळणे. ३) उपरोक्त विभागामध्ये कोणकोणत्या कामाला किती प्रमाणात निधी वापरण्यात आला त्याची सविस्तर माहिती मिळणे. ४) माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील ६(३) नुसार अर्ज संबंधित विभागाकडे वर्ग करून माहिती उपलब्ध करून देण्यात यावी."*

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.२३/२/२०२२ रोजी, *“ जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारांना कार्यालयीन १५ दिवसाचे आत कार्यालयीन अभिलेख्यात उपलब्ध असलेली माहिती विनामुल्य पुरविण्यात यावी.”* असा निर्णय दिलेला आहे.

तक्रारकर्ता यांनी निवेदन केले की, सदरची माहिती शाखा अभियंता श्री.पराळे, श्री.पोळ व श्री.गावडे यांचेकडून प्राप्त करून द्यावयाची होती. श्री.पराळे व श्री.पोळ यांचेकडून माहिती प्राप्त झाली.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.हिरवे यांनी निवेदन केले की, श्री.गावडे यांचेकडून माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांना देता आली नाही. आता श्री.गावडे यांचेकडून माहिती आणली असून ती आता तक्रारकर्ता यांना देता येईल.

तक्रारकर्ता यांना सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली. त्यांना माहिती प्राप्त झाली आहे.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

तक्रारकर्ता यांना माहिती प्राप्त झाल्याने, तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १८ नोव्हेंबर, २०२५ .

राज्य माहिती आयोग
सत्यमेव जयते
महाराष्ट्र

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

Comp-३